संसदीय कार्य विभागाच्या आस्थापनेवरील १० अस्थायी पदे दिनांक ३० सप्टेंबर, २०१९ पर्यत पुढे चालू ठेवण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
संसदीय कार्य विभाग
शासन निर्णय क्रमांक आस्थापना-०४१७/प्र.क्र.३०/पाच

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई. ४०० ०३२
दिनांक : ८ मार्च, २०१९.

संदर्भ :- १) शासन निर्णय, वित्त विभाग क्र. असंक-१००४/प्र.क्र.१२(भाग-२)/२००४/विसु-१ दिनांक ०४ ऑक्टोबर, २००४

२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. पदनि २०१६ / प्र.क्र.८/१६ /आ.पु.क., दिनांक ०३ ऑक्टोबर, २०१७

३) शासन निर्णय, संसदीय कार्य विभाग क्र.आस्थापना-०४१७/ प्र.क्र.३०/पाच, दिनांक २४ ऑक्टोबर, २०१७

४) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. पदनि २०१६ /प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दिनांक ०८ जानेवारी, २०१८

५) शासन निर्णय, संसदीय कार्य विभाग क्र.आस्थापना-०४१७/ प्र.क्र.३०/पाच, दिनांक १५ मार्च, २०१८

६) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. पदनि २०१६ /प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दिनांक ०७ सप्टेंबर, २०१८.

७) शासन निर्णय, संसदीय कार्य विभाग क्र.आस्थापना-०४१७/ प्र.क्र.३०/पाच, दिनांक ११ सप्टेंबर, २०१८.

८) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.पदनि २०१६/प्र.क्र.८/१६/आ. पु. क., दिनांक २१ फेब्रुवारी, २०१९.

शासन निर्णय:-

संसदीय कार्य विभागाच्या आस्थापनेवरील खाली नमूद केलेल्या एकूण १० अस्थायी पदांना संदर्भाधिन अनुक्रमांक ७ येथील शासन निर्णयान्वये दिनांक ३० सप्टेंबर, २०१८च्या पुढे दिनांक २८ फेब्रुवारी, २०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

२. संदर्भाधीन अनुक्रमांक ८ येथील, वित्त विभागाचा शासन निर्णय दिनांक २१ फेब्रुवारी, २०१९ अन्वये देण्यात आलेल्या अधिकारानुसार, **संसदीय कार्य विभागाच्या आकृतिबंधात समाविष्ट असलेल्या खाली नमूद केलेल्या या विभागाच्या आस्थापनेवरील १० अस्थायी पदांना दिनांक ०१ मार्च, २०१९ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०१९ या कालावधीसाठी याद्वारे मुदतवाढ देण्यांत येत आहे :-**

अ.क्र.	पदनाम	पदसंख्या	वेतनश्रेणी (रुपये)
१	२	३	४
१	कक्ष अधिकारी (राजपत्रित-ब)	२	एस-१७ : ४७६००-१५१००० एस -२० : ५६१००-१७७५००
२	सहायक कक्ष अधिकारी	३	एस -१४ : ३८६००-१२२८००
३	लिपीक-टंकलेखक	२	एस -६ : १९९००-६३२००
४	शिपाई	३	एस -१ : १५०००-४७६००
	एकूण	**१०**	

२. उपरोक्त पदांवर होणारा खर्च या विभागाच्या "मागणी क्रमांक पी-१, अंतर्गत असलेल्या क्रमांक २०५२, सेक्रेटरिएट - सर्वसाधारण सेवा, ०९०, सचिवालय (००) (००) (०१) संसदीय कार्य विभाग (संगणक संकेतांक २०५२०२६८) -०१ वेतन" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यांत यावा व सदर लेखाशिर्षाखालील सन २०१९-२० या वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यांत यावा.

३. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दिनांक २१ फेब्रुवारी, २०१९ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांच्या अधीन राहून निर्गमित करण्यात येत आहे.

४. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संकेताक २०१९०३०८१३०९२३१११५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यांत येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Tikamdas N. Shikharame

Digitally signed by Tikamdas N. Shikharame
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Parliamentary Affairs Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=12c50633547b609d1eafa52a6f58635e0b53088462877241f83faca5a99dd3a6, serialNumber=fff96b73586192ac64353a38dbf120f4d2fcbfde73126be0eb475e370e7f4a49, cn=Tikamdas N. Shikharame
Date: 2019.03.08 13:12:01 +05'30'

(टि. न. शिखरामे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई,
२) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परीक्षा) मुंबई,
३) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
४) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, बांद्रा कुर्ला संकुल, बांद्रा (पूर्व), मुंबई,
५) आहरण व संवितरण अधिकारी, रोखशाखा (२ प्रतीसह), संसदीय कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई,
६) सामान्य प्रशासन विभाग कार्या.१४, १४-अ.
७) वित्त विभाग, व्यय-४, अर्थसंकल्प १८, वित्तीय सुधारणा-१ व आ.पु.क., मंत्रालय, मुंबई,
८) सर्व कक्ष अधिकारी, संसदीय कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई,
९) निवड नस्ती.